जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४७८ दिनांक - १५/११/२०२४

गुन्हे शाखा युनिट-६

# वाघोली येथील गावठी हातभट्टीवर कारवाई

आगामी विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुशंगाने मा.वरिष्ठांचे आदेशाने कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी गुन्हे प्रतिबंधक कारवाई तसेच बेकायदेशीर हत्यार,अग्निशस्त्र वापरणारे यांचे विरोधात कडक कारवाईचे आदेश झाले आहे.

दि.१३/११/२०२४ रोजी सदर आदेशाचे अनुशंगाने गुन्हे शाखा युनिट ६ येथील **पोलीस अंमलदार ताकवणे**, **मेमाणे** यांना त्यांचे बातमीदार मार्फत बातमी मिळाली कि, ग्रोदेज कंस्ट्रक्शन साईट मांजरी खुर्द यांचे बाजुला ओढयाचे कडेला काटवनात एक इसम गावठी हातभटटीची दारु तयार करण्याकरीता लागणारे कच्चे रसायन व तयार गावठी हातभटटीची दारु जवळ बाळगुन आहे.

सदर बातमीचे अनुषंगाने गुन्हे शाखा युनिट ६ व वाघोली पोलीस ठाणे कडील स्टाफ यांचे सह जावुन संयुक्तरीत्या शोध घेवुन छापा टाकुन १५००० लीटर गावठी हातभट्टीचे कच्चे रसायन व ३० लीटर गावठी हातभटटीची तयार दारु व इतर मुद्देमाल, असा एकुण ०५,५०,०००/- किंमतीचा प्रोव्हिबिशन गुन्हयाचा माल मिळुन आला आहे.

सदर अनोळखी इसम पुर्ण नाव पत्ता माहीत नाही यांचे विरुद्ध वाघोली पोलीस स्टेशन गु.र.नं.१०७९/२०२४, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम ६५ (ई) व (फ) प्रमाणे प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री शैलेश बलकवडे, मा.पोलीस उपआयुक्त (गुन्हे) श्री निखिल पिंगळे, मा. सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट -६ चे पोलीस निरीक्षक वाहिद पठाण, सहा.पोलीस निरीक्षक मदन कांबळे,पोलीस उपनिरीक्षक रामकृष्ण दळवी, पोलीस अंमलदार, रमेश मेमाणे, बाळासाहेब सकटे, नितीन मुंढे, कानिफनाथ कारखेले, ऋषीकेश ताकवणे सचिन पवार, ऋषीकेश व्यवहारे, गणेश डोंगरे, शेखर काटे, नितीन धाडगे, सुहास तांबेकर, मपोअं.प्रतिक्षा पानसरे, किर्ती मांदळे व वाघोली पोलीस ठाणे तपास पथक यांनी केली आहे.

